दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक १६ मंगळवार दि.१५ जुलै २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## पालिका निवडणुकीआधी ठाकरेंना मिळणार दिलासा? शिवसेना पक्ष-चिन्ह प्रकरणावर सुप्रीम कोर्टाचे महत्त्वाचे विधान




शिवसेना पक्ष आणि चिन्ह धनुष्यबाणावर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. ठाकरे गटाकडून दाखल केलेल्या याचिकेवर आजची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी संपली. आता आम्ही ऑगस्टमधील तारीख देण्याचा प्रयत्न करु असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं आहे. कोर्टाच्या या विधानामुळे या प्रकरणाचा निकाल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर आज सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठापुढे सुनावणी पार पडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीआधी ही निवडणूक चिन्ह मिळावे यासाठी ठाकरे गट प्रयत्नशील आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह वापरण्यापासून एकनाथ शिंदे यांना रोखावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली. याबाबत आज सुनावणी झाली.

निवडणूक चिन्हाची कायदेशीर लढाई महत्त्वाच्या टप्प्यावर हे प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. आता याप्रकरणाची मुख्य सुनावणी ऑगस्ट महिन्यात घेऊ, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले. मात्र, अद्याप त्यांनी तारीख निश्चित केलेली नाही. दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाने सुनावणी घेण्याची तयारी सुप्रीम कोर्टाने दाखवली. त्यामुळे आता निवडणूक चिन्हाची कायदेशीर लढाई महत्त्वाच्या टप्प्यावर आली असल्याचे म्हटले जात आहे. यातच आता ऑगस्ट महिन्यात याचा निकाल लागण्याची शक्यता असल्याने ठाकरे गटाला निवडणुकीआधी दिलासा मिळणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

तर दुसरीकडे, निवडणूक चिन्हाच्या याचिकेवरील सुनावणी पूर्ण होऊन निकाल सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत होईल असे मत ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सिद्धार्थ शिंदे यांनी व्यक्त केले. राज्यात ऑक्टोबरच्या आसपास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. त्याआधी निकाल येण्याची शक्यता असल्याचे ॲड. शिंदे यांनी म्हटले.

## भारताने आमच्यावर एअर स्ट्राईक केला ; शेजारील देशाचा ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांचा आरोप



भारताच्या सीमेला लागून असलेल्या म्यानमारच्या सागाईंग प्रांतात सक्रिय असलेल्या उल्फा (आय) या दहशतवादी संघटनेने आरोप केला आहे की भारताने ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांद्वारे त्यांच्या छावणीवर मोठा हल्ला केला आहे. या हल्ल्यात टॉप कमांडर नयन मेधीसह अनेक टॉप दहशतवादी मारले गेल्याचा आरोप उल्फाने केला आहे. मात्र, भारतीय लष्कर (आर्मी) आणि हवाई दलाने अशा कोणत्याही सीमापार हल्ल्याचा स्पष्टपणे इन्कार केला आहे.

आसाममधील दहशतवादी संघटना, युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा) म्हणजेच उल्फा (इंडिपेंडंट) ने एक निवेदन जारी करून भारतावर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांचा आरोप केला आहे. निवेदनानुसार, काल सकाळी, उल्फा कमांडर नयन मेधी उर्फ नयन असोम यांचे अंत्यसंस्कार सुरु असताना, त्याठिकाणी उपस्थित असलेल्या आणखी एका कमांडरचा क्षेपणास्त्र हल्ल्यात मृत्यू झाला. उल्फाचा तळ म्यानमारच्या सागाईंग प्रांतात चूरपारी उल्फाच्या म्हणण्यानुसार, छावणीवरील ड्रोन हल्ल्यात नयन मेधीचाही मृत्यू झाला. हे कॅम्प भारताच्या सीमेवर असलेल्या म्यानमारच्या सागाईंग प्रांतातील वक्थम टाउनशिपमध्ये आहे.याठिकाणी उल्फा या अतिरेकी संघटनेचा कॅम्प क्रमांक ७७९ आहे. याशिवाय, होयत बस्ती येथील उल्फाच्या पूर्व मुख्यालयावर (कॅम्प) हल्ला करण्यात आला. गेल्या दीड दशकात आसाममधील बंडखोरीचे उच्चाटन केल्यानंतर, उल्फाने म्यानमारला आपला बालेकिल्ला बनवले आहे.

म्यानमारमध्ये लष्करी राजवटीची पकड ढिली झाल्यामुळे आणि बंडखोरांनी आपले स्थान वाढवल्यामुळे, भारतविरोधी संघटनांना सुरक्षित आश्रय मिळाला आहे. यामुळेच भारताच्या सीमेला लागून असलेल्या म्यानमारच्या जंगली भागात उल्फा आणि एनएससीएन (आय) सारख्या संघटना सक्रिय झाल्या आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार , उल्फा कॅम्प व्यतिरिक्त, नॅशनलिस्ट सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (आय) च्या तळांवरही ड्रोन हल्ले करण्यात आले आहेत. आतापर्यंत एकूण चार दहशतवादी तळांवर झालेल्या हल्ल्यांची माहिती समोर आली आहे. हे सर्व छावण्या म्यानमारमधील चीन सीमेला लागून असलेल्या भागात असल्याचे सांगितले जाते. उल्फा नेता परेश बरुआ अनेक वर्षांपासून बेपत्ता चूरपारी

विशेष म्हणजे, उल्फा नेता परेश बरुआ गेल्या अनेक वर्षांपासून बेपत्ता आहे आणि तो चीन-म्यानमार सीमेवर किंवा बांगलादेशात कुठेतरी लपला असल्याचे मानले जाते.

## दोन राज्यांना मिळाले नवे राज्यपाल, एका केंद्रशासित प्रदेशात नवे नायब राज्यपाल

नवी दिल्ली - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन राज्यांमध्ये नव्या राज्यपालांची नियुक्ती केली असून, एका केंद्रशासित प्रदेशात नायब राज्यपाल (एलजी) यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. हरियाणा आणि गोवा या राज्यांना नवे राज्यपाल मिळाले असून, लडाखला नवे नायब राज्यपाल मिळाले आहेत.

केंद्र सरकारने हरियाणाचे नवे राज्यपाल म्हणून असीम कुमार घोष यांची नियुक्ती केली आहे, तर गोव्याचे नवे राज्यपाल म्हणून पशुपती अशोक गजपती राजू यांची निवड करण्यात आली आहे. लडाखच्या बाबतीत बोलायचे झाले तर, कविंदर गुप्ता यांची नायब राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली आहे.

सध्या लडाखचे विद्यमान नायब राज्यपाल ब्रिगेडियर बी.डी. मिश्रा यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारला आहे. नव्याने नियुक्त झालेल्या राज्यपालांचा कार्यकाल कार्यभार स्वीकारण्याच्या तारखेपासून सुरू होईल. विशेष बाब म्हणजे, पशुपती अशोक गजपती राजू हे माजी केंद्रीय मंत्री राहिले आहेत, तर कविंदर गुप्ता हे जम्मू-काश्मीरमधील भाजपचे वरिष्ठ नेते असून, काही काळ उपमुख्यमंत्रीपदावरही राहिले आहेत.

राज्यपालांची नियुक्ती कशी होते? भारतीय संविधानाच्या कलम १५३ मध्ये राज्यपालांच्या नियुक्तीबाबत माहिती देण्यात आली आहे. यानुसार, प्रत्येक राज्यासाठी एक राज्यपाल असेल. १९५६ मध्ये संविधानात केलेल्या दुरुस्तीनुसार, एका व्यक्तीला दोन किंवा अधिक राज्यांच्या राज्यपालपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते. कलम १५५ नुसार, राज्याच्या राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपती आपल्या स्वाक्षरी आणि शिक्क्याखालील वारंटद्वारे करतील. राज्यपालाचा सामान्य कार्यकाल ५ वर्षांचा असतो. मात्र, राष्ट्रपतींना इच्छा असेल तर ५ वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वीही राज्यपालाला पद सोडावे लागू शकते. राष्ट्रपती हे पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने आणि सहाय्याने कार्य करत असल्याने, राज्यपालांची नियुक्ती आणि पदमुक्ती ही केंद्र सरकारद्वारे केली जाते.

पात्रता काय असते? राज्यपालपदासाठी कोणती पात्रता आवश्यक आहे, याबाबत कलम १५७ आणि १५८ मध्ये अटी निश्चित करण्यात आल्या आहेत.

## रेणापूर शहर मंडल भाजपा नूतन पदाधिकाऱ्यांना आ. कराड यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्राचे वाटप



लातूर : - भारतीय जनता पार्टी रेणापूर शहर मंडल कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे रविवारी लातूर येथील संवाद कार्यालयात वाटप करण्यात आले. यावेळी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास त्यांनी शुभेच्छा दिल्या.

रेणापूर शहर मंडलाचे अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांनी जाहीर केलेल्या पदाधिकाऱ्यात युवा मोर्चा अध्यक्ष अमर चव्हाण, महिला मोर्चा अध्यक्ष अर्चनाताई यशवंते, किसान मोर्चा अध्यक्ष लक्ष्मण खलंग्रे, व्यापारी आघाडी अध्यक्ष नंदकुमार बंडे, अल्पसंख्यांक आघाडी अध्यक्ष रफिक शिकलकर, वैद्यकीय सेवा अध्यक्ष डॉ. उत्तरेश्वर हेरकर, अपंग आघाडी अध्यक्ष देव वाडकर, ओबीसी मोर्चा आघाडी अध्यक्ष बाबुराव कस्तुरे, अनुसूचित जाती जमाती मोर्चा आघाडी अध्यक्ष आकाश चव्हाण, आध्यात्मिक आघाडी अध्यक्ष गोविंद बाबर महाराज यांच्यासह पानगाव शहराध्यक्ष गणेश तूरुप, खरोळा शहराध्यक्ष हनुमंत राऊतराव यांचा समावेश आहे. शहर मंडल कार्यकारणीत उपाध्यक्ष - गोपाळ शेंडगे, माधव घुले, प्रल्हाद फुलारी, चंद्रकांत आलापुरे, सरचिटणीस - सुकेश भंडारे, भाऊसाहेब गुळबिले, भागवत गीते, वसंत राठोड, निवृत्ती लहाने, चिटणीस नानासाहेब माने, राजेश काळे, सतीश माने, संजय डोंगरे, राजकुमार मानमोडे, रमाकांत संपत्ते यांचा समावेश असून इतर पदाधिकाऱ्यात महिला मोर्चा उपाध्यक्ष मनीषा मुंडे, भाग्यश्री चिताडे, सरचिटणीस सरोज वल्लमपल्ले, शाहूताई नराळे, महादेवी जगताप, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष राजेंद्र गिरी, अनुसूचित जाती मोर्चा आघाडी उपाध्यक्ष संग्राम कांबळे, सरचिटणीस आबासाहेब भोसले, शरद धबडगे, चिटणीस राजू कांबळे, प्रकाश साळवे, किसान मोर्चा सरचिटणीस वैजनाथ लहाने, अल्पसंख्यांक आघाडी उपाध्यक्ष शेख चांद, सरचिटणीस रफिक पठाण इत्यादींचा समावेश आहे. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, अनिल भिसे, शरद दरेकर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या व पक्षवाढीच्या कामाबरोबरच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ गरजू लाभार्थ्यांना गोरगरीब सर्वसामान्य जनतेला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. अनेक नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून पक्षाचे काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आता सरकारकडूनच मिळणार मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना १ लाखांचा मोबाइल फोन

राजधानी दिल्लीत भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर ४ महिन्यांनी मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना सरकारी घरे देण्यात आली आहेत, आता दिल्ली सरकार मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना सरकारी पैशांनी लाखो रुपयांचे मोबाइलही एक प्रकारे मोफत देणार आहे. जर मुख्यमंत्री आणि मंत्र्यांनी स्वतःच्या पैशाने मोबाइल फोन खरेदी केले तर दिल्ली सरकार नियमांनुसार ठरवलेल्या मर्यादेत मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना पैसे परत करेल. दिल्ली सरकारच्या प्रशासकीय विभागाने ९ जुलै रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, मुख्यमंत्र्यांना मोबाइल फोन खरेदी केल्यावर १ लाख ५० हजार रुपयांपर्यंतची परतफेड केली जाईल. म्हणजेच, जर दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी स्वतः १ लाख ५० हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी किमतीचा मोबाइल फोन खरेदी केला तर बिल जमा केल्यानंतर, दिल्ली सरकार त्यांच्या खात्यात सर्व पैसे जमा करेल. तसेच, जर दिल्ली सरकारच्या मंत्र्यांनीही १ लाख २५ हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी किमतीचा मोबाइल फोन खरेदी केला तर दिल्ली सरकार बिल सादर केल्यानंतर फोनचे पैसे त्यांना परत करेल. आदेशानुसार मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना दोन वर्षांत एकदाच ही सुविधा मिळेल. जर मोबाइल फोनमध्ये काही दोष असेल आणि तो दोष दुरुस्त करण्याचा खर्च मोबाइल फोनच्या एकूण किमतीच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तर प्रत्येक प्रकरणाच्या आधारे मोबइल फोन बदलता यईल. वास्तविक २०१३ पासून दिल्लीमध्ये असा नियम लागू होता, परंतु तेव्हा दिल्ली सरकार मुख्यमंत्र्यांनी मोबाइल फोन खरेदी केल्यावर फक्त ५० हजार रुपये आणि मंत्र्यांनी मोबाइल फोन खरेदी केल्यावर ४५ हजार रुपये देत असे. आता, जुन्या आदेशात सुधारणा करून, मुख्यमंत्र्यांसाठी मर्यादा ३ पट आणि मंत्र्यांसाठी २.८ पट वाढवण्यात आली आहे.

## सामूहिक विवाह म्हणजे सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ - डॉ. विश्वासराव आरोटे







सोलापूर (प्रतिनिधी) :- सोलापूर जिल्ह्यात वैदू समाजाच्या वतीने भव्य अशा सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा म्हणजे केवळ विवाहसोहळा नव्हता, तर सामाजिक प्रबोधन व एकतेचे प्रतिक बनून उभा राहिला. या सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण हिंदुस्तानभर विखुरलेल्या वैदू समाजातील बांधव एकत्र आले होते. या कार्यक्रमात समाजहितासाठी कार्य करणाऱ्या अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात बोलताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी वैदू समाजाच्या सामाजिक परिवर्तनाबाबत महत्वाचे विचार मांडले. त्यांनी सांगितले की,

संपूर्ण हिंदुस्तानामध्ये वैदू समाज विस्तारलेला असून, आता हा समाज संघटितपणे समाजहिताची कामे करण्याचा निर्धार करत आहे. जुनाट जात पंचायत व्यवस्था बाजूला सारून समाजाला दिशा देण्याचे कार्य दशरथ आटकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. डॉ. आरोटे यांनी वैदू समाजातील पोलिस दलात, लष्करामध्ये व शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे उदाहरण देत समाजातील सकारात्मक बदलावर प्रकाश टाकला.

आपले कर्तव्य बजावत असताना काम करणारा एखादा पोलिस अधिकारी समाजासाठी रात्रंदिवस झटतो. ही गोष्ट संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे ते म्हणाले. त्यांनी पुढे नमूद केले की,

भटकंती सोडून, शिक्षण, नोकरी व व्यवसायाकडे वळण्याचा निर्णय हा समाजाच्या बदललेल्या मानसिकतेचा नमुना आहे. 'व्यवसाय - नोकरी - मग छोकरी' हा आदर्श स्वीकारत वैदू समाजाने नवा पायंडा पाडला आहे. त्यांनी वैदू समाजाच्या भावनिक नात्यांवरही प्रकाश टाकताना सांगितले की,

एखाद्या व्यक्तीवर प्रेम केले तर तिच्यासाठी रक्त देण्याची तयारी असणारा समाज म्हणजे वैदू समाज! आज वैदू समाज शिक्षण, कला, क्रीडा, प्रशासन आणि राजकारणात आपले अस्तित्व निर्माण करीत आहे. मात्र अजूनही राजकीय स्तरावर समाजाला अपेक्षित प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

वैदू समाजाला देखील लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये योग्य तो सन्मान व प्राधान्य मिळायला हवे. समाजाची ताकद ओळखून त्यांना प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे, अशी ठाम मागणी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केली. सामूहिक विवाह सोहळ्यात एकूण तेरा वधू-वरांचे शुभमंगल विधी पार पडले. वऱ्हाडे, समाजबांधव व मान्यवरांच्या उपस्थितीत संपूर्ण सोहळा अत्यंत भक्तिभावाने आणि सुसंवादाने पार पडला. सामाजिक सलोखा, खर्च वाचवणारी पद्धत आणि एकात्मतेचा आदर्श वैदू समाजाने यातून जगासमोर ठेवला आहे. या सोहळ्याचे आयोजन, व्यवस्थापन, भोजन व्यवस्था, वधू-वरांना भेटवस्तू आदी सर्व बाबतीत समाजबांधवांचा सक्रिय सहभाग होता. विशेष म्हणजे कोणत्याही बड्या प्रायोजकांशिवाय हा सोहळा समाजबांधवांच्या एकजुटीच्या जोरावर पार पडला. हा विवाह सोहळा वैदू समाजाच्या नवचैतन्याचा आणि सामाजिक बदलाच्या दिशेने टाकलेल्या ठाम पावलांचा साक्षीदार ठरला आहे.

# संपादकीय

## बिहारमध्ये सत्ताधार्यांची कसोटी

बिहारला अनेकदा देशाची 'राजकीय प्रयोगशाळा' म्हटले जाते आणि हे राज्य पुन्हा राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आले आहे. तेथील निवडणुकीची लढाई आता केवळ पाटण्याच्या खुर्चीपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर भाजपसाठी बिहारमधील सत्ता टिकवणे हे आता त्यांच्या राजकीय विश्वासार्हतेची आणि संघटनात्मक ताकदीची कसोटी बनली आहे. बिहार राज्य हातातून निसटले, तर दिल्लीची सत्ता टिकवणे आव्हानात्मक ठरेल, अशी चर्चा पक्षांतर्गत आणि विरोधकांमध्ये जोर धरू लागली आहे.

निवडणूक आयोगाकडून या संपूर्ण परिस्थितीत राबवण्यात येत असलेल्या 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एआयआर) मोहिमेने आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. विरोधकांचा आरोप आहे की, ही मोहीम म्हणजे गरीब, मुस्लिम आणि कागदपत्रे नसलेल्या लोकांना मतदार यादीतून वगळण्यासाठी केलेली एक 'सॉफ्ट नागरिकता तपासणी' आहे. यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून, हा मुद्दा अधिक गंभीर बनल्यास केंद्र सरकारवरही नैतिक दबाव वाढेल. बिहारचे राजकारण जातीय समीकरणांवरच चालते. तेथे विकासाच्या गप्पांदरम्यानही मतदान जातीच्या आधारावरच होते. त्यामुळेच प्रत्येक पक्षाने जातीय समीकरणे लक्षात घेऊनच आपले पत्ते पिसले आहेत. भाजपला हे चांगलेच माहीत आहे की, नितीश कुमार यांची साथ ही त्यांची गरजही आहे आणि ताकदही. नितीश कुमार यांच्याशिवाय भाजपने बिहारमध्ये कधीही सरकार स्थापन केलेले नाही. २०१० पासून आतापर्यंत जदयू आणि भाजपच्या जोडीने अनेकदा समीकरणे बनवली आणि बदलली; पण प्रत्येक वेळी नितीश कुमार यांची खुर्ची अबाधित राहिली. त्यांच्यावर 'पलटूराम' म्हणून टीकाही झाली; पण बिहारच्या राजकारणात त्यांचा प्रभाव आजही कायम आहे, हे एनडीएचे रणनीतिकार जाणून आहेत.

नितीश कुमार यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळात महिला मतदारांमध्ये मोठी पकड निर्माण केली आहे. दारूबंदी, मुलींसाठी सायकल योजना यांसारख्या योजना त्यांच्यासाठी 'व्होट बँक'पेक्षाही एक कायमस्वरूपी विश्वास बनल्या आहेत. बिहारमध्ये महिला मतदारांची टक्केवारी पुरुषांपेक्षा जास्त राहिली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ती सुमारे ५९ टक्क्यांपर्यंत पोहोचली. हा वर्ग निवडणुकीत आपला मोठा आधार बनेल, असा भाजपला विश्वास आह; पण नितीश कुमार यांचे वय आणि प्रकृती आता एक नवीन आव्हान बनले आहे. त्यांच्या करिश्माला पूर्वीसारखी धार राहिलेली नाही, अशी चिंता पक्षाच्या आतल्या गोटात आहे. त्यांच्या मतदारांमध्येही, विशेषतः तरुण आणि काही महादलित गटांमध्ये, फूट पडू लागल्याचे दिसत आहे. विरोधक याच कमकुवतपणावर निशाणा साधत आहेत. राजद नेते तेजस्वी यादव यांनी आपल्या रणनीतिला 'माय+बाप' असे नाव दिले आहे. म्हणजेच, मुस्लिम-यादव या पारंपरिक व्होट बँकेत बहुजन, अगडा (सवर्ण), आधी आबादी (महिला) आणि गरीब वर्गाला जोडण्याचा हा प्रयत्न आहे. मागील काही निवडणुकांमध्ये राजदला सर्वाधिक मतांची टक्केवारी मिळाली; पण जागांचे गणित त्यांच्या विरोधात गेले. यावेळी तेजस्वी यादव यांनी पासवान, कुशवाहा, धानुक, मल्लाह यांसारख्या जातींमध्ये शिरकाव करण्यासाठी नवीन चेहरे पुढे आणले आहेत. मंगनी लाल मंडल यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड हा याच रणनीतीचा भाग आहे. त्यांची ईबीसी आणि धानुक समाजात चांगली पकड आहे.

काँग्रेसही मागे नाही. त्यांनी जाटव म्हणजेच रविदास समाजातील राजेश कुमार यांना प्रदेशाध्यक्ष बनवून दलित मतदारांना आकर्षित करण्याची रणनीती आखली आहे; मात्र मायावतींचा बहुजन समाज पक्षही येथे आव्हान उभे करत असल्याने रविदास समाजाची मते कोणाकडे जाणार, हा प्रश्न आहे. तर दुसरीकडे, डावे पक्ष, विशेषतः सीपीआय (एम-एल) लिबरेशन, उत्तर बिहारमधील गरीब भूमिहीन, दलित आणि लहान ओबीसी वर्गांवर प्रभाव टाकत आहेत. ही सर्व लहान-मोठी समीकरणे जुळून आल्यास एनडीएला पराभूत करता येईल, अशी महाआघाडीला आशा आहे. याच समीकरणांच्या लढाईत भाजपनेही आपले नवे गणित मांडले आहे. चिराग पासवान, ज्यांचे दिवंगत वडील रामविलास पासवान एकेकाळी बिहारच्या दलित राजकारणातील सर्वात मोठा चेहरा होते, ते आता एनडीएचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. पासवान व्होट बँक, विशेषतः पश्चिम आणि मध्य बिहारमध्ये, भाजप-जदयू आघाडीला बळकटी देते. जीतन राम मांझी यांचाही महादलित समाजात प्रभाव आहे. उपेंद्र कुशवाहा यांचा पक्षही कुशवाहा-कोईरी मते मिळवण्यासाठी मदत करत आहे.

अशा परिस्थितीत बिहारमधील पराभव म्हणजे भाजपच्या जातीय 'सोशल इंजिनिअरिंग' मॉडेलचा पराभव असेल, ज्याचा परिणाम उर्वरित हिंदी भाषिक राज्यांवरही होऊ शकतो. महाराष्ट्रामध्ये हिंदी भाषिकांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेमुळे भाजप आधीच चिंतेत आहे. हिंदी भाषिकांच्या मनातील जखमेवर मलम लावण्यासाठी खासदार निशिकांत दुबे यांच्यामार्फत राजकीय हल्लाही करवला, जेणेकरून बिहार विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून परतणार्या मतदारांच्या रोषाचा सामना करावा लागू नये. एका अंदाजानुसार, केवळ मुंबईतच बिहारचे २.५ लाख प्रवासी कामगार राहतात.

# बिहारमध्ये खडतर वाट!

चिराग यांनी बिहारमध्ये एनडीए आघाडी निवडणुकीत विजयी होणार असा दावा केला, तर दुसरीकडे ते स्वतः सर्वच्या सर्व उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरवण्याची शक्यता आहे. संसदेचं पावसाळी अधिवेशन बर्यापैकी गाजण्याची चिन्हे आहेत. पहलगाम हल्ला, पसार झालेले दहशतवादी, पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हल्ला करण्यापूर्वी भारताने पाक लष्कराला दिलेली पूर्वसूचना, अहमदाबादमधील विमान दुर्घटना, पूल कोसळल्याची घटना, बिहारमध्ये मतदारांचे सघन पुनर्चाचणी असे कितीतरी मुद्दे विरोधकांच्या कमानी पाजवून ठेवले आहे. देशात अलीकडच्या काळात घडलेल्या घटनांचे आयते कोलीत विरोधी पक्षांच्या हातात सापडले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक चोरण्याच्या मुद्द्याला धार देऊन बिहारमध्ये भाजपची चौफेर कोंडी करण्याचा प्रयत्न करीत आहे. एक मात्र नक्की की, बिहारच्या आगामी निवडणुकीत भाजपला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. आपल्याला धावा वाढविता येत नसतील तर दुसर्या टीममधील बॅट्समनला शक्तिहीन करायचे असा प्रकार सध्या बिहारमध्ये बघायला मिळतो आहे.

भाजपप्रणित रालोआ बिहारची निवडणूक मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढविणार असली तरी चेहरा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाच राहणार आहे. बिहारमध्ये रालोआचे सरकार आले तर निवडणुकीनंतर महाराष्ट्र पॅटर्न राबविला जाईल अशी भीती नितीशकुमार यांना वाटते आहे. एकीकडे, राहुल गांधी आणि माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव आहेत तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीशकुमार आहेत. राष्ट्रीय लोकजन शक्ती पक्षाचे नेते आणि केंद्रीय मंत्री चिराग पासवान आणि रणनीतिकार प्रशांतकुमार यांच्यासह बिहारमधील तमाम लहानमोठे पक्ष निवडणुकीच्या मैदानात उतरणार असले तरी त्याचा फायदा सत्ताधारी पक्षालाच होणार आहे. मागच्या निवडणुकीतही हा प्रकार दिसून आला आहे. नितीशकुमार आणि जेडीयूची पारंपरिक व्होटबँक म्हणजे बिहारमधील अत्यंत मागासलेल्या जाती. या जातींचा समुदाय आता नितीशकुमार यांच्यापासून लांब जात असल्याचे दिसून येत आहे. बिहारमध्ये अत्यंत मागासलेल्या जातींची संख्या सर्वाधिक ३७ टक्के आहे. गेल्या चार-पाच निवडणुकांमध्ये नितीशकुमार यांनी या जातींना उच्च जाती आणि यादवांच्या अत्याचाराचा धाक दाखवून त्यांची मते मिळविली आणि सत्ता मिळविली, असे म्हटले जाते.

यावेळी उच्च जातींची मते मोठ्या प्रमाणात भाजपकडे जाऊ शकतात. यामुळे अत्यंत मागासलेले मतदार जेडीयू आणि भाजपपासून दूर जाऊ शकतात. नितीश यांच्या आरोग्यामुळे आणि त्यांच्या अस्थिर अभिव्यक्तीमुळे त्यांच्या मुख्य मतदारांमध्येही संशयाची भावना निर्माण झाली आहे. अत्यंत मागासलेले नागरिक बर्याच काळापासून तक्रार करत आहेत की, त्यांचे अधिकार त्यांना मिळत नाही. कलवार, सूरी आणि तेली या तिन्ही जातींना खासदार, आमदार या निवडणुका लढवण्यात आणि जिंकण्यातही सर्वाधिक प्रतिनिधित्व मिळते. उच्च सरकारी पदांवरही, या तिन्ही जाती ईबीसीवर वर्चस्व गाजवतात.ईबीसी जातींना कलवार, तेली आणि सुरी जोडपत्रात म्हणजेच ओबीसी जातीमध्ये समाविष्ट करावे अशी इच्छा आहे. ईबीसी अंतर्गत १०० जाती आहेत ज्यांची संख्या एक लाखापेक्षा कमी आहे. यामुळे येणार्या विधानसभा निवडणुकीत ईबीसी जातींची मुख्य चिंता ही आहे की वेगवेगळ्या सभागृहांमध्ये योग्य प्रतिनिधित्व कसे मिळवायचे. बिहारमध्ये निवडणूक आयोगाच्या पुढाकारामुळे चर्चेत आलेला 'मतदार यादी पुनरावृत्ती' हा मुद्दा सत्ताधारी पक्षाच्या अंगलट येऊ शकतो. राज्यातील गरीब आणि अल्पसंख्याक मतदारांना हे पटवून देण्यात राज्यातील विरोधी पक्षांना मोठ्या प्रमाणात यश येत असल्याचे दिसून आहे. सध्याचे सरकार गरिबांकडून त्यांचा मतदानाचा अधिकार हिसकावून घेऊ इच्छित आहे, हे पटवून देण्यात राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यशस्वी होताना दिसत आहे.

बिहारमध्ये भाजपची आणखी एक डोकेदुखी म्हणजे, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांचे सरकार. गुप्ता सरकार ज्या पद्धतीने दिल्लीतील झोपडपट्ट्यांवर बुलडोजर चालवित आहेत त्याचे पडसाद बिहारच्या निवडणुकीमध्ये नक्की दिसून येणार, असे भाजपच्या रणनीतिकारांना वाटत आहे. या झोपडपट्यांमध्ये जे लोक राहतात त्यात बिहारी सर्वाधिक आहेत. पोटापाण्याच्या शोधात बिहारमधून आलेले नागरिक दिल्लीत स्थायिक झालेत. ते या झोपडपट्यांमध्येच राहतात. गुप्ता सरकार आता त्यावर बुलडोझर चालवित आहे. यांचा आक्रोश बिहारमधील त्यांच्या घरांमध्येही ऐकू येतो.चिराग पासवान ही एक वेगळी डोकेदुखी आहे. चिराग पासवान रालोआचे घटक पक्ष असले तरी बिहार सरकारवर निशाणा धरून आहेत. त्यांच्या अलीकडच्या परस्परविरोधी विधानांमुळे राजकारण गुंतागुंतीचे झाले आहे. चिराग पासवान यांनी अतिशय कठोर शब्दात या हत्येला चिंताजनक म्हटले आहे. हे हत्याकांड म्हणजे बिहारमधील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे संकेत असल्याचा त्यांचा दावा आहे. लालू-राबडींच्या जंगलराजबद्दल बोलणारे नितीशकुमार बिहारची कायदा आणि सुव्यवस्था सांभाळू शकत नाहीत, गुन्हेगार निर्भय झाले आहेत आणि सुशासन पूर्णपणे कोलमडले आहे, अशा शब्दात चिराग पासवान यांनी नितीशकुमार यांचा समाचार घेतला आहे. अशा परिस्थितीत, सर्वात मोठा प्रश्न उद्भवतो तो म्हणजे केंद्र सरकारमधील मंत्री चिराग पासवान यांच्या विधानाचा अर्थ काय? चिराग पासवान यांनी आपल्या विधानाने बिहारच्या नितीश सरकारसाठी अस्वस्थ परिस्थिती निर्माण करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही त्यांनी अनेक वेळा बिहारमधील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती बिकट असल्याचे वारंवार वर्णन केले आहे.या वर्षी ऑक्टोबर-




नोव्हेंबरमध्ये बिहारमध्ये होणार्या संभाव्य विधानसभा निवडणुकांबाबतही चिराग पासवान यांनी एनडीए आघाडीसाठी पेच निर्माण केला आहे. एकीकडे, त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या अधिकृत निवासस्थानी झालेल्या जागावाटप बैठकीत भाग घेतला. एनडीए आघाडी निवडणुकीत विजयी होणार असा दावा केला. बिहारमध्ये मुख्यमंत्रिपदाची खुर्ची रिकामी राहणार नाही असेही सांगितले. तर दुसरीकडे त्यांनी बिहारमधील सर्व २४३ जागांवर निवडणूक लढवण्याची घोषणा केली.

चिराग पासवान यांनी ३० जागांची मागणी केली आहे. जेडीयू ही बाब अजिबात मान्य करणार नाही. मात्र ते आपल्या मतांवर ठाम आहे. अर्थात एवढ्या जागा नाही मिळाल्या, तर ते सर्व जागांवर आपला उमेदवार उतरवतील. चिराग पासवान शेवटच्या क्षणापर्यंत भाजप आणि जेडीयूला कोंडीत ठेवू इच्छितात. शिवाय त्यांच्या विधानांनी बिहारमध्ये संशयास्पद अशी परिस्थिती निर्माण केली आहे.

आहे. चिराग पासवान आणि त्यांचे मेहुणे लोकसभेचे खासदार अरुण भारती यांची काही विधानं बघितली तर याची जाणीव नक्कीच होईल.राजद नेते तेजस्वी यादव आणि महाविकास आघाडीतील सर्व पक्ष बिहारमधील कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाल्याचा आरोप करीत आहेत. यामुळे नितीशकुमार यांची कोंडी झाली आहे. दुसरीकडे, लालूप्रसाद यादव आणि राबडी देवी यांच्या जंगलराजची आठवण बिहारच्या लोकांना सतत करून देणारे जेडीयू आणि भाजप नेते सरकारच्या बाजूने युक्तिवाद करत आहेत.

पण एनडीए आघाडीचा भाग असलेले आणि नरेंद्र मोदींच्या केंद्र सरकारमधील मंत्री चिराग पासवान यांच्या विधानामुळे एनडीए आघाडीत, विशेषतः जेडीयू नेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. लोक जनशक्ती पक्षाचे (राम विलास) प्रमुख आणि केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी बिहारची राजधानी पाटण्यातील एका पॉश भागात बडे उद्योगपती गोपाळ खेमका यांच्या हत्येवरून त्यांच्याच आघाडी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे.

# वारसा जपायला हवा



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या एकूण १२ किल्ल्यांचा युनोस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज यादीमध्ये समावेश होणे ही निश्चितच आनंदाची गोष्ट आहे. तरी त्यापाठोपाठ हा वारसा जपण्याची जबाबदारीही आली आहे. मुळात छत्रपती शिवरायांनी आपल्या कारकिर्दीमध्ये ज्या गड किल्ल्यांची उभारणी केली त्यापैकी निवडक किल्ले आज सुस्थितीत आहेत. महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील एका किल्ल्याचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये समावेश झाल्याने सर्वत्र आनंदाची आणि समाधानाची भावना व्यक्त केली जात आहे. तरी शिवरायांनी निर्माण केलेला हा वारसा जपण्याचे काम आता सर्वांनाच करावे लागणार आहे.

महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, खांदेरी, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी या १२ किल्ल्यांचा समावेश या जागतिक वारसा यादीमध्ये झाला आहे. यापैकी जे जलदुर्ग आहेत ते तर शिवरायांच्या पराक्रमाची आणि दूरदृष्टीची साक्ष देत आहेत. युनोस्कोच्या या निर्णयाच्या निमित्ताने या सर्व ठिकाणच्या पर्यटनाला चालना मिळण्याची शक्यता आहे. मात्र या पर्यटनामुळेच या जागतिक वारसा स्थळांना धक्का पोहोचू नये याची काळजीही घ्यावी लागणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांनी याबाबत जी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे ती सर्वात महत्त्वाची आहे. जर युनोस्कोने तयार केलेले निकष पाळले नाहीत आणि वारसा स्थळांची जपणूक त्या पद्धतीने केली नाही, तर हा जागतिक वारसा स्थळाचा दर्जा कधीही काढून घेतला जाऊ शकतो.

अशा प्रकारचा धोका राज ठाकरे यांनी निर्देशित केला आहे आणि सरकारसह सर्वांनाच त्याची दखल घ्यावी लागणार आहे. काही वर्षांपूर्वी जेव्हा पश्चिम घाटालासुद्धा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये स्थान मिळाले होते, त्यानंतर सातारा जिल्ह्यातील कास पठार असेल किंवा पश्चिम घाटातील इतर पर्यटन स्थळे असतील त्या ठिकाणी पर्यटकांचा ओघ वाढायला सुरुवात झाली. मात्र कोणत्याही विकासाच्या पाठोपाठ ज्या अनिष्ट गोष्टी येतात त्या या सर्व पर्यटन स्थळांच्या ठिकाणी आल्या. त्याचा फटका आता पश्चिम घाटाला बसत असल्याचे दिसत आहे. हा इतिहास समोर असल्याने शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या १२ किल्ल्यांबाबत मात्र काळजी घेण्याचे धोरण आता सरकारला घ्यावे लागणार आहे.

एखाद्या स्थानाचा समावेश जागतिक वारसा यादीमध्ये होतो तेव्हा आंतरराष्ट्रीय पातळीवरून त्या स्थळांच्या विकासासाठी निधीची उपलब्धतासुद्धा होते. या निधीचा वापर करून त्या वारसास्थळाचे संरक्षण आणि संवर्धन करणे अपेक्षित असते. त्याच्या जोडीने संबंधित देशातील सरकारनेसुद्धा काही उपाययोजना करणे अपेक्षित असते. गेल्या वर्षीच्या प्रारंभी जेव्हा महाराष्ट्र सरकारने या १२ किल्ल्यांचा समावेश युनोस्कोच्या यादीमध्ये करावा म्हणून प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला होता तेव्हा केंद्र सरकारने हा प्रस्ताव यूनोकडे पाठवताना चांगला पाठपुरावा केला. कागदपत्रांसह इतर सर्व व्यवस्था चांगली झाल्याने युनोस्कोच्या अधिकार्यांनी या १२ किल्ल्यांना वारसा स्थळांमध्ये समाविष्ट केले.

ज्या उत्साहाने आणि गांभीर्याने या १२ किल्ल्यांचा समावेश वारसा स्थळांच्या यादीमध्ये व्हावा यासाठी प्रयत्न झाले तेवढेच गांभीर्य या वारसा स्थळांचे पावित्र्य कायम राहावे यासाठी दाखवावे लागणार आहे. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये देशातील विशेषतः महाराष्ट्रातील अंतर्गत पर्यटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. देशासह महाराष्ट्रातही वीकेंड कल्चर विकसित झाल्याने शनिवार-रविवारी आसपासच्या कुठल्या तरी किल्ल्यावर किंवा गडावर जाऊन पर्यटन करणे हा एक संस्कृतीचा भाग बनू पहात आहे. पण आठवड्यातील दोन दिवस रिलॅक्स होण्यासाठी अशा पर्यटन स्थळांच्या ठिकाणी येणारे पर्यटक अनेक वेळा नुकसानच करत असल्याचे लक्षात येते.

तेथील पर्यावरणाला हानी पोहोचवली जाते. प्लॅस्टिकचा बेसुमार वापर केला जातो. पाण्याचे प्रदूषण होते. भारतातील अनेक मोठ्या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी अशाच चुकीच्या गोष्टी घडताना दिसतात. ज्याप्रकारे इंग्लंडमधील काही जुने राजवाडे आणि किल्ले जतन करण्यात आले आहेत आणि कोणत्याही बडेजावाशिवाय त्या ठिकाणी स्वच्छता आणि पर्यावरणपूरक नियम पाळले जातात त्याच धर्तीवर आता छत्रपती शिवरायांच्या या किल्ल्यांची निगराणी करावी लागणार आहे. त्यानिमित्ताने जो निधी उपलब्ध होणार आहे त्याचा वापर करून ह्या किल्ल्यांची डागडुजी करावी लागेल.

त्या व्यतिरिक्त या किल्ल्यांपर्यंत पोहोचणारे रस्ते आणि इतर सुविधाही उपलब्ध करून द्याव्या लागतील. महत्त्वाचे म्हणजे पर्यटनासाठी एखादी नियमावली तयार करून त्याची अत्यंत कडकपणे अंमलबजावणी करावी लागेल. आज इतक्या वर्षांनंतरही जे गडकिल्ले छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देत ठामपणे उभे आहेत आणि कोट्यवधी मराठी बांधवांना प्रोत्साहन व ऊर्जा देण्याचे काम करत आहेत त्या गडकिल्ल्यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव होत असताना हा अमूल्य वारसा जोपासण्याचे काम आपल्यालाच करावे लागणार आहे हे सरकार, सर्वसामान्य नागरिक आणि पर्यटक या सर्वांनाच लक्षात घ्यावे लागेल.

# – आमदार अमित देशमुख माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते हरंगुळ खुर्द येथे नालंदा बुद्ध विहाराचे लोकार्पण

लातूर (प्रतिनधी) : – गावातील दैनंदिन जीवनमान सुधारण्यासाठी ग्रामपंचायतीने स्वच्छता आणि पाणीपुरवठ्याच्या बाबतीत विशेष काळजी घेण्याचे आवाहन करुन नागरिकांनीही नाल्यात कचरा न टाकता ठरवून दिलेल्या ठिकाणी जमा करावा, गावात अवैध दारू विक्री आणि जुगार असे प्रकार चालू नयेत यासाठी पोलीस विभागाने काळजी घ्यावी, तसेच महिलांची मागणी लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने दारू दुकानास परवानगी देऊ नये, यासह अनेक महत्त्वाच्या सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जनता दरबारात बोलताना केल्या. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज रवीवार, १३ जुलै रोजी सकाळी हरंगुळ खुर्द येथे भेट दिली. यावेळी त्यांनी बौद्ध नगर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या नालंदा बुद्ध विहाराचे लोकार्पण केले आणि महिला भगिनी व गावकऱ्यांसमवेत प्रार्थना केली. मनशांती आणि मानव कल्याणासाठी तथागत गौतम बुद्धांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरणारे असून, या विचारांचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी हे बुद्धविहार उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे हरंगुळ (खुर्द) येथे आगमन झाल्यावर त्यांच्या हस्ते दलित वस्तीतील नालंदा बौद्ध विहार



सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर गावभागातील सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नालीच्या बांधकाम कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत माजी आमदार तथा विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, टवेन्टीवन शुगर्सचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, व्हा. चेअरमन ड. समद पटेल, तालुका अध्यक्ष सुभाष घोडके, गटविकास अधिकारी तुकाराम भालके, पोलीस निरीक्षक ज्ञानदेव सानप, संचालक बळवंत पाटील, डॉ. बालाजी वाघमारे, अनिल दरकसे, अनंत बारबोले, परमेश्वर वाघमारे, धनंजय वैदय, विरसेन भोसले आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

> राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते हरंगुळ खु. येथील आयेशा मकदूम शेख यांची महावितरण मध्ये सहाय्यक अभियंता या पदावर निवड झाले बददल सत्कार करण्यात आला.

हरंगुळ ग्रामस्थांसह गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह श्री हनुमान मंदिरासमोरील सभागृहात जनता दरबार घेण्यात आला. या जनता दरबारात तालुक्याचे सर्व वरिष्ठ अधिकारी, सरपंच, उपसरपंच, इतर महत्त्वाच्या संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. आमदार देशमुख यांनी गावकऱ्यांसमवेत मोकळेपणाने संवाद साधून त्यांच्या समस्या, अडचणी ऐकून घेतल्या आणि त्यांची निवेदने स्वीकारली. जनता दरबारात बोलताना आमदार देशमुख म्हणाले की, गावातील दैनंदिन जीवनमान सुधारण्यासाठी ग्रामपंचायतीने स्वच्छता, पाणीपुरवठ्याच्या बाबतीत विशेष काळजी घ्यावी. नागरिकांनीही नाल्यात कचरा न टाकता ठरवून दिलेल्या ठिकाणी जमा करावा. गावात अवैध दारू विक्री, जुगार असे प्रकार चालू नयेत यासाठी पोलीस विभागाने काळजी घ्यावी, तसेच महिलांची मागणी लक्षात घेता ग्रामपंचायतीने दारू दुकानास परवानगी देऊ नये, यासह अनेक महत्त्वाच्या सूचना त्यांनी केल्या. पाणंद रस्त्या संदर्भात गावात स्थापन केलेल्या समितीने एकत्रित सर्व प्रस्ताव तहसीलदारांकडे सादर करावेत, ग्रामपंचायतीने सामूहिक स्मशानभूमी संदर्भातील मागणी नोंदवावी, समाज मंदिर, तलाठी भवन तसेच इतर योजनांचे प्रस्ताव दाखल करावेत, असे सांगून हे सर्व प्रस्ताव तातडीने मार्गी लावले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. गावकऱ्यांनी दिलेल्या सर्व निवेदनांसंदर्भात संबंधित विभागाला पाठपुरावा करून हे सर्व प्रश्न मार्गी लावले जातील, अशी ग्वाही माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी दिली. तसेच त्यांनी उपसरपंच श्री. आनंद पवार यांच्या निवासस्थानी भेट दिली. दरम्यान कार्यक्रमात हरंगुळ खुर्द ग्रामपंचायतच्या वतीने कचरा संकलनासाठी कचराकुंडीचे गावातील नागरीकांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास हरंगुळ खुर्द येथील सरपंच श्रीदेवी झुजे पाटील, उपसरपंच अनंत पवार, धनराज पाटील, राजकुमार झुजे पाटील, उमाकांत भुजबळ, तानाजी राठोड, बाबासाहेब गायकवाड, कस्तुरबाई मसलकर, संगीता चापुले, निकीता झुंजे, शितल भुजबळ, सविता पवार, पार्वती होळकर, ज्ञानदेव होळकर, मनोहर झुजे पाटील, शिवाजी झुजे पाटील, श्रीकांत भुजबळ, अमीर शेख, रुकमीनबाई गायकवाड, लोचनबाईल सावळे, विमल वाघमारे, सुंदरबाई शिंदे, श्रीदेवी गायकवाड, सुनीता वाघचौडे, शंकुतला वाघचौडे, मनिषा शिंदे, सुजानबाई गायकवाड, सविता सरवदे, अंजना घोडके, कमलबाई गायकवाड आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाहेरचं कशाला घरीच बनवा टेस्टी आणि सर्वांच्या आवडीचा नाइट क्रेव्हिंग्ससाठी परफेक्ट

चिकन पिझ्झा हा एक लोकप्रिय इटालियन पदार्थ आहे जो आज जगभरातील खाद्यप्रेमींच्या मनात स्थान मिळवून आहे. खमंग बेस, चवदार चिकन, झणझणीत सॉस आणि वरून भरपूर चीज यामुळे हा पिझ्झा घरात बनवताना एक वेगळी मजा येते. खास करून मुलांना हा प्रकार खूप आवडतो. तुम्ही जर पहिल्यांदाच घरी पिझ्झा बनवत असाल, तर ही रेसिपी तुमच्यासाठी एक परफेक्ट रेसिपी आहे.

पिझ्झा अनेक प्रकारे बनवला जातो मात्र आज आम्ही तुमच्यासाठी चिकन पिझ्झाची एक चविष्ट आणि स्वादिष्ट अशी रेसिपी घेऊन आलो आहोत. अनेकांना आपल्या पिझ्झामध्ये फारशा भाज्या आवडत नाहीत अशात तुम्ही चिकन पिझ्झा तयार करू शकता. पिझ्झाची ही रेसिपी वाटते तितकी अवघड नसून फार साधी, सोपी आणि झटपट तयार होणारी आहे. घरी आलेल्या पाहुण्यांसाठी अथवा पार्टीजसाठी हा पदार्थ एक चांगला पर्याय ठरेल. चला





जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य पिझ्झा बेससाठी (किंवा रेडीमेड वापरू शकता):

मैदा – २ कप
यीस्ट – १ चमचा
साखर – १ चमचा
कोमट पाणी – अर्धा कप
मीठ – चवीनुसार
ऑलिव ऑइल – २ चमचे

टॉपिंगसाठी:

उकडलेले किंवा भाजलेले चिकन तुकडे – १ कप
मोझरेला चीज – १ कप (किसलेले)
पिझ्झा सॉस – अर्धा कप
कांदा – १ मध्यम (पातळ चिरलेला)
सिमला मिरची – १ (चिरलेली)
मिरेपूड – ट चमचा
मिक्स हर्ब्स (ऑरिगेनो, चिली फ्लेक्स) – १ चमचा
मीठ – चवीनुसार

कृती चिकन पिझ्झा बनवण्यासाठी आपल्याला सर्वप्रथम याचा बेस तयार करावा लागेल ज्यासाठी एका वाडग्यात

कोमट पाण्यात यीस्ट व साखर घालून १० मिनिटं फुलवून घ्या

मग त्यात मैदा, मीठ व ऑलिव ऑइल घालून मऊ पीठ मळून घ्या. हे पीठ झाकून १ तास झाकून ठेवा.

ओव्हन १८० डिग्री सेल्सियसवर १० मिनिटं प्रिहीट करा. पीठ फुलल्यावर त्याचा गोळा करून गोलसर बेस लाटून घ्या. शेल्फ किंवा ट्रेमध्ये ठेवून काट्याने छिद्र करा.

पिझ्झा बेसवर पिझ्झा सॉस चांगल्या प्रकारे पसरवा.

त्यावर चिकनचे तुकडे, कांदा, सिमला मिरची पसरवा. वरून किसलेले चीज, मिरेपूड व हर्ब्स शिंपडा.

पिझ्झा ओव्हनमध्ये १५–२० मिनिटं किंवा चीज वितळेपर्यंत आणि बेस खमंग होईपर्यंत बेक करा.

तयार चिकन पिझ्झा गरम गरम तुकडे करून टोमॅटो सॉस किंवा चिली फ्लेक्ससोबत सर्व्ह करा.

तुमच्याकडे ओव्हन नसल्यास तुम्ही जा पिझ्झा तव्यावर देखील तयार करू शकता, यासाठी गॅसवर कढई ठेवून त्यात एक स्टँड ठेवा

या स्टँडवर एक प्लेट ठेवून त्यात तयार पिझ्झा टाका आणि झाकण ठेवून मंद आचेवर पिझ्झा १५–२० मिनिटे शिजवून घ्या

# कारलं खायला आवडत नाही? मग सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा झणझणीत कारल्याचं भरीत, लहान मुलंसुद्धा आवडीने खातील

लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत अनेकांना कारलं खायला आवडत नाही. चवीला कडू असणाऱ्या कारल्याचे नाव घेतल्यानंतर लहान मुलं नाक मुरडतात. पण कारल्याची भाजी आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. शरीरात वाढलेला मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेक लोक उपाशी पोटी कारल्याच्या रसाचे सेवन करतात. कारल्याच्या रसात चिमूटभर काळे मीठ टाकून प्यायल्यास बद्धकोष्ठता आणि आरोग्यासंबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळेल. कारल्याची भाजी चवीला कडू लागते. पण या भाजीचे आठवड्यातून एकदा किंवा दोनदा सेवन केल्यास शरीरात सकारात्मक बदल दिसून येतील. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला झणझणीत कारल्याचे भरीत बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. कारल्याचे भरीत भाकरी, चपाती किंवा भातासोबत सुद्धा तुम्ही खाऊ शकता. अनेक घरांमध्ये चिंच, गूळ घालून भाजी बनवली जाते तर काही लोक ओल खोबर घालून कारल्याची भाजी बनवतात. चला तर जाणून घेऊया कारल्याचे भरीत बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
कारल्याची भाजी
लसूण कांदा
टोमॅटो हिरव्या मिरच्या शेंगदाण्याचा कूट
चिंच कोळ लाल तिखट मीठ हळद काळा मसाला

कृती: कारल्याचे भरीत बनवण्यासाठी सर्वप्रथम, कारली स्वच्छ पाण्याने धुवून घ्या. त्यानंतर कारल्याचे देठ काढून घ्या.

त्यानंतर कारल्याच्या गोलाकार चकत्या करून त्याच्या आतील बिया काढून घ्या. गरम पाण्यात १५ मिनिटं कारली शिजण्यासाठी ठेवा.

कढईमध्ये तेल गरम करून त्यात मोहरी, हिंग, हळद घाला आणि वरून कांदा, टोमॅटो घालून मिक्स करा. त्यानंतर त्यात लसूण घालून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करा.

कांदा टोमॅटो व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. त्यानंतर कढईवर झाकण ठेवून गॅस मंद आचेवर ठेवा.

त्यानंतर त्यात चिंच कोळ, शेंगदाण्याचा कूट आणि लाल तिखट, गरम मसाला आणि काळा मसाला घालून व्यवस्थित मिक्स करा. तयार केलेल्या मसाल्यामध्ये शिजवून मॅश केलेली कारली घालून व्यवस्थित मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले झणझणीत कारल्याचे भरीत. हा पदार्थ भाकरीसोबत खूप सुंदर लागेल.

# कोलेस्ट्रॉलने भरलेल्या नसा होतील कायमच्या होतील स्वच्छ! आहारात करा 'या' फळांचे सेवन, हृदय राहील मजबूत

दैनंदिन आहारात सतत तेलकट किंवा तिखट पदार्थांचे अतिसेवन केल्यामुळे शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढण्याची शक्यता असते. शरीरात कोलेस्टरॉलसोबतच मधुमेह आणि इतर आजारांची सुद्धा वाढ होते. शरीरात दोन प्रकारचे कोलेस्ट्रॉल आढळून येते. चांगले कोलेस्ट्रॉल आणि खराब कोलेस्ट्रॉल. शरीरासाठी चांगले कोलेस्ट्रॉल अतिशय महत्वाचे असते. पण वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर हृदयाच्या रक्तवाहिन्यांना इजा पोहचण्याची शक्यता असते. खराब कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर रक्तवाहिन्यांमध्ये पिवळ्या रंगाचा चिकट थर जमा होऊ लागतो. हा चिकट थर जमा झाल्यानंतर हृदयाच्या रक्तवाहिन्या ब्लॉक होऊन जातात. ज्यामुळे हार्ट अटॅक किंवा हृद्यासंबंधित समस्या उद्भवण्याची शक्यता असते. नसांमध्ये साचून राहिलेले खराब कोलेस्ट्रॉल संपूर्ण शरीराला हानी पोहचवते.

शरीरात वाढलेल्या कोलेस्ट्रॉलमुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांसोबतच संपूर्ण शरीराच्या रक्तवाहिन्या ब्लॉक होऊन जातात. ज्यामुळे मेंदूला योग्य प्रमाणात रक्त पोहचत नाही. शरीरात ऑक्सिजन पुरवठा योग्य न झाल्यामुळे बऱ्याचदा हार्ट अटॅक येण्याची जास्त शक्यता असते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला शरीरात वाढलेले खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आहारात कोणत्या फळांचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या फळांचे सेवन केल्यामुळे शरीरात वाढलेले कोलेस्ट्रॉल कमी होते.

आंबट फळांचे सेवन:

शरीरासाठी आंबट फळे अतिशय प्रभावी आहेत. रोजच्या आहारात



लिंबू, संत्री, मोसंबी आणि द्राक्ष किंवा इतर आंबट फळांचे सेवन केल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. या फळांमध्ये असलेले गुणकारी घटक आरोग्यासाठी अतिशय महत्वाचे ठरतात. विटामिन सी युक्त फळांचे सेवन केल्यामुळे नसांमध्ये साचून राहिलेले खराब कोलेस्ट्रॉल बाहेर पडून जाते आणि आरोग्य सुधारण्यास मदत होते.

सफरचंद:

'रोज एक सफरचंद खा आणि डॉक्टरकडे जाणे विसरा' असे अनेकदा बोलले जाते. सकाळच्या नाश्त्यात नियमित रोज एक सफरचंद खाल्ल्यास शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात. यासोबतच कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. सफरचंदामध्ये पेक्टिन नावाचे फायबर आढळून येते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये साचलेले खराब कोलेस्ट्रॉल बाहेर पडून जाण्यास मदत होते.

अॅवोकाडो:

आरोग्यासाठी अॅवोकाडो अतिशय गुणकारी आहे. अॅवोकाडोचा वापर करून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. अॅवोकाडो सँडविच, अॅवोकाडो सॅलड किंवा इतरही अनेक पदार्थ बनवले जातात. यामध्ये ऑलिव अॅसिड भरपूर आढळून येते, ज्यामुळे रक्तवाहिन्या स्वच्छ होतात. फायबरने समृद्ध असलेले अॅवोकाडो खाल्ल्यास शरीराला अनेक फायदे होतात.

(संबंधित प्रश्न)

कोलेस्ट्रॉल म्हणजे काय?

कोलेस्ट्रॉल शरीरात नैसर्गिकरित्या तयार होणारे एक मेद आहे, जे पेशी आणि काही हार्मोन्स बनवण्यासाठी आवश्यक असते.

कोलेस्ट्रॉलची पातळी कशी तपासायची?

कोलेस्ट्रॉलची पातळी तपासण्यासाठी रक्ताची तपासणी करणे आवश्यक आहे. तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधा.

कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी किती वेळ लागतो?

जीवनशैलीत बदल केल्यास काही आठवड्यांमध्ये कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होऊ शकते, पण काही लोकांसाठी यात जास्त वेळ लागू शकतो, काही महिने किंवा त्याहून जास्त.

# संध्याकाळचा नाश्ता थोडा चिजी होऊन जाऊद्यात; घरी बनवा सर्वांच्या आवडीचा


अनेकांना संध्याकाळ झाली की काही ना काही चविष्ट खाण्याची इच्छा होऊ लागते. अशावेळी तेच तेच जेवण नाही तर काहीतरी वेगळं आणि टेस्टी खाण्याची इच्छा होते. म्हणूनच आज आम्ही तुमच्यासाठी एक चविष्ट आणि सर्वांच्या तोंडाला पाणी आणणारी रेसिपी घेऊन आलो आहोत. आजच्या आपल्या रेसिपीचे नाव आहे मॅक अँड चीजची एक जबरदस्त रेसिपी! चीजने भरलेली ही रेसिपी तुमच्या संध्याकाळची मजा आणखीनच द्विगुणित करेल. मॅक अँड चीज एक अमेरिकन डिश आहे जी जगभर फार प्रसिद्ध आहे. तुम्हाला फास्ट फूड खायला फार आवडत असेल तर ही रेसिपी तुमच्या आवडीची ठरणार आहे. खासकरून मुलांना आणि चीजप्रेमींसाठी ही रेसिपी म्हणजे पर्वणीच! मॅकरोनी पास्ता आणि चीज यांच्या अफलातून संगमामुळे तयार होणारी ही डिश खूपच क्रीमी, मऊसर आणि चवदार असते. ही डिश आपण संध्याकाळच्या नाश्त्यासाठी किंवा लंचमध्ये पटकन तयार करू शकतो. चला लगेच जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य मॅकरोनी पास्ता – २ कप दूध – २ कप मैदा (असलेल फळपदार्थ) – २ टेबलस्पून बटर – २ टेबलस्पून किसलेले चीज – १ ते १.५ कप (चेडर किंवा प्रोसेस्ड) काळी मिरी पावडर – ट टीस्पून मीठ – चवीनुसार थोडे ओरेगॅनो / हर्ब्स (ऐच्छिक) कृती मॅक अँड चीज बनवण्यासाठी सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात पाणी उकळून त्यात थोडं मीठ घालावं. त्यात मॅकरोनी टाकून ८–१० मिनिटे शिजवावी. नंतर गाळून एकदाच थंड पाण्याने धुवून घ्यावी. कढईत बटर गरम करून त्यात मैदा टाकून मध्यम आचेवर हलवावं. मैदा १–२ मिनिटे परतून घ्यावा, जोपर्यंत त्याचा कच्चा वास निघून जात नाही.

# त्वचेवर येईल काचेसारखी चमक! वाटीभर खोबरेल तेलात मिक्स करा 'हा' पदार्थ, घरगुती उपाय ठरेल प्रभावी

सर्वच महिलांना चमकदार आणि सुंदर त्वचा हवी असते. त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक वेगवेगळ्या उपाय केले जातात. कधी स्किन केअर प्रॉडक्टमध्ये बदल केला जातो तर कधी बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या क्रीम्स लावल्या जातात. मात्र त्वचेची काळजी घेताना त्वचेला सूट होईल असेच स्किन केअर प्रॉडक्ट वापरावे, अन्यथा त्वचा अधिकच निस्तेज आणि कोरडी पडून जाते. याशिवाय वातावरणात सतत होणाऱ्या बदलांमुळे, धूळ, माती, प्रदूषणामुळे त्वचेवर घाण जमा होऊ लागते. ही घाण त्वचेच्या ओपन पोर्समध्ये जमा झाल्यानंतर चेहरा अतिशय तेलकट आणि चिकट होऊन चेहऱ्यावर पिंपल्स येतात. त्वचेवरील नाहीशी झालेली चमक पुन्हा मिळवण्यासाठी महागड्या स्किन ट्रीटमेंट किंवा इतरही अनेक वेगवेगळे उपाय केले जातात.तसेच धावपळीच्या जीवनशैलीमुळे वारंवार पार्लरमध्ये जाण्यासाठी वेळ मिळत नाही.

महिला पार्लरमध्ये गेल्यानंतर फेशियल किंवा क्लिनअप, इतर महागड्या स्किन ट्रीटमेंट करून घेतात. त्वचेवर वाढलेला कोरडेपणा आणि रुक्ष झालेली त्वचा सुधारण्यासाठी महिला अनावश्यक खर्च करतात. मात्र यामुळे त्वचा काही वेळापुरतीच सुंदर आणि चमकदार दिसते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला त्वचेचा हरवलेला ग्लो पुन्हा परत मिळवण्यासाठी खोबऱ्याच्या तेलात कोणते पदार्थ मिक्स करून लावावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. घरगुती पदार्थांचा वापर त्वचेसाठी केल्यास चेहरा नैसर्गिकरित्या स्वच्छ आणि सुंदर होईल.

त्वचेवर ग्लो मिळवण्यासाठी घरगुती उपाय: त्वचा नैसर्गिकरित्या स्वच्छ आणि चमकदार ठेवण्यासाठी बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या प्रॉडक्टचा वापर करू नये. यासाठी वाटीमध्ये पिकलेले केळ व्यवस्थित मॅश करून घ्यावे. त्यानंतर त्यात चमचाभर दही आणि आवश्यकतेनुसार खोबऱ्याचे तेल टाकून मिक्स करा. तयार केलेला फेसपॅक संपूर्ण त्वचेवर लावून काहीवेळ तसाच ठेवा. यामुळे त्वचा आतून स्वच्छ होण्यास मदत होईल. याशिवाय त्वचेची हरवलेली चमक पुन्हा मिळेल. त्यानंतर हातांना पाणी लावून हलक्या हाताने मसाज करून घ्या. यामुळे





डेड स्किन कमी होण्यास मदत होईल. त्यानंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. हा उपाय आठवड्यातून दोनदा किंवा तीनदा केल्यास त्वचा अतिशय उजळदार आणि सुंदर दिसेल. मागील अनेक वर्षांपासून खोबरेल तेलाचा वापर त्वचा आणि केसांसाठी केला जात आहे. यामुळे त्वचा मुलायम आणि सुंदर होते. खोबरेल तेल त्वचा खोलवर मॉइश्चराईज करून कोरडेपणा कमी करण्यास मदत करते.

# सद्गुणाने माणसे थोर आणि मोठी होतात - भिक्खु पय्यानंद थेरो







लातूर :- शील, सदाचार, शांती, करुणा, मैत्री आणि नीती हे नैतिकतेचे प्रमुख अंग आहेत. सदाचाराचा मार्ग हा चांगुलपणाचा मार्ग आहे. त्यामुळे सद्गुणरुपी सन्मार्गाने मनुष्य जातीने जाण्याचा सातत्याने प्रयत्न मनुष्य जातीने केला पाहिजे. यामुळेच सद्गुणाने माणसे थोर आणि मोठी होतात असे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे. आषाढ पौर्णिमेनिमित्त वर्षावास अधिष्ठान व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने महाविहार, धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता. जि. लातूर येथे येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भिक्खू संघ व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पुष्पाने, धुपाने आणि दीपाने पूजा करून त्रिसरण पंचशील व बुद्ध वंदनेने करण्यात आली. महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्राप्त भुजंग कांबळे यांच्या समवेत नागोराव बोरीकर, मोहन शृंगारे, बसवंतप्पा उबाळे, डी.एस.नरसिंगे, संजय लातूरकर, अशोक कांबळे, डॉ. जितेंद्र वाघमारे, प्रा. यु. डी. गायकवाड, रवींद्र कांबळे, संजीवनी गडेराव या सर्वांचा जाहीर सत्कार समाज बांधवांच्यावतीने करण्यात आला. याप्रसंगी पुढे बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो म्हणाले की, तथागत भगवान बुद्ध हे जगातील मानव जातीचे पहिले कल्याण मित्र आहेत. तथागत बुद्धाची शिकवण ही मानव कल्याणाची असल्याने तथागत बुद्ध हे खऱ्या अर्थाने जगाचे जगद्गुरु आहेत. जगाला बुद्धाच्या शिकवणीची गरज कायम भासणार आहे आणि म्हणून सर्व मनुष्य जातीने बुद्धाच्या तत्त्वांचे आपल्या जीवनात पालन करून स्वकल्याण करून घ्यावे. बुद्ध होणं म्हणजे शब्दांना आचरणानं आणि विचाराने शुद्ध होण आहे. असेही आपल्या धम्मदेसनेत भंतेजी म्हणाले. याप्रसंगी भंते बोधिराज यांचीही धम्मदेसना झाली. कार्यक्रमास पांडुरंग अंबुलगेकर, उत्तम कांबळे, इंजि. एम एन गायकवाड, ज्योतीराम लामतुरे, गणपतराव कदम, ये.पी. कांबळे, राहुल शाक्य मुनी, उदय सोनवणे, विलास अवशंख, करन ओव्हाळ, परमेश्वर आदमाने, कांताबाई सरोदे, शोभा सोनकांबळे, शकुंतला नेत्रगावकर, मिना कदम, निर्मला थोटे, शामल कांबळे, प्रतिभा आदमाने, कविता धावारे, शीला बनसोडे, कल्पना कांबळे आणि मोठ्या संख्येने बौध्द उपासक उपासिका उपस्थित होते. अवंती नगर, हडको कॉलनी, आणि एकता महिला मंडळाच्यावतीने सर्वांना भोजनदान करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद धावारे यांनी केले तर आभार डॉ. अरुण कांबळे यांनी मानले.

# नेरूळ येथील निसर्गरम्य ज्वेल पार्क येथे विश्वशांतिदूत : गौत्तम बुद्ध यांचा भव्यदिव्य पुतळा लोकार्पण

बुद्ध हा विष्णुचा अवतार नसुन ते साऱ्या विश्वाला शांतीचा संदेश देणारे व सर्वांना अंधश्रद्धा, कर्मकांडातून बाहेर काढणारे आणि सर्वांना दुःखमुक्तीचा मार्ग दाखविणारा, जाती पातीवर प्रहार करणारा तसेच या भूतलावरील सर्व पशु प्राणी आणि निसर्गावर जीवापाड प्रेम करणारा विश्व शांतीदूत तथागत भगवान गौतम बुद्ध आहे हे येथील राज्यकर्त्यांनी प्रथम लक्षात घ्यावे व तसे लोकांना ठासून सांगितले किंवा त्यांच्यावर बिंबवले तरच आपल्या भारत देशातील लोकांच्या मनात हजारो वर्षापासून घर करून बसलेल्या अंधश्रद्धा, कर्मकांड यातून जेव्हां लोक बाहेर पडतील तेव्हांच आपल्या देशाची प्रगती होईल..! बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते.

बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय..! असे पुर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे आणि ते जगजाहीर पण केले आहे हे तुम्हा आम्हाला सर्वज्ञात असताना, तरी पण काही मनुवादी विचार सरणीचे राज्यकर्ते जाणुन बुजुन लोकांवर बुद्ध हा विष्णूचा नववा अवतार आहे असे बिंबवत आहेत-लादत आहेत, हे कितपत योग्य आहे ? याचे थोडेफार तरी लोकनेत्यांना भान असायला हवे.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक : १२/७/२०२५ रोजी नुकतेच ज्वेल ऑफ नवी मुंबई पार्क नेरूळ येथे महानगरपालिकेच्या वतीने बुद्धमूर्ती लोकार्पण सोहळा भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, सदर कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे श्री. ना. वनमंत्री गणेश नाईक या कार्यक्रमाला संबोधित करताना म्हणाले की, भगवान गौत्तम बुद्ध हे विष्णूचा अवतार आहे..! असे उद्गार त्यांनी या कार्यक्रमस्थळी काढल्याने बौद्ध-आंबेडकरी समाजांच्या भावना दुखावल्या आहेत, महामानव प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दिलेल्या धम्मदीक्षा प्रसंगी २२ प्रतिज्ञा मधील ५ व्या प्रतिज्ञेचे उल्लंघन महाराष्ट्र राज्य वन मंत्री श्री. ना. गणेश नाईक यांनी ज्वेल ऑफ नवी मुंबई पार्क येथील तथागत भगवान गौत्तम बुद्ध यांच्या भव्यदिव्य मुर्ती लोकार्पण सोहळ्यात वरिल वक्तव्य काढले, सदर विचार मंचावर आदरणीय : भंते तसेच नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त : कैलासजी शिंदे तसेच बेलापूर विधानसभेच्या विद्यमान आमदार : मंदाताई म्हात्रे, माजी महापौर : सुधाकर सोनवणे, माजी महापौर : जयवंत सुतार, माजी सिडको संचालक : नामदेव भगत, तसेच या विचार मंचावर उपस्थित समाजसेवक : महेश खरे, चंद्रकांत कांबळे, रवींद्र सावंत, चंदु जगताप, वीरेंद्र लगाडे, मंगेश गायकवाड, एल. आर. गायकवाड, सिद्राम वोहळ इत्यादी शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यां समोर हे वक्तव्ये जग जाहीर केल्याने उपस्थित सर्व बौद्ध - आंबेडकरी अनुयायी यांच्या भावना दुखावल्या आहेत याचा विचार लोकनेते यांनी करावा. सदर प्रस्ताव हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे यांच्या वतीने केला होता त्यानंतर मंदाताई म्हात्रे यांनी तो प्रस्ताव त्यांच्या पत्रावरती महानगरपालिकेला देऊन सदर मूर्ती ही ज्वेल ऑफ नवी मुंबई पार्क येथे बसवावी असे पत्र महानगरपालिकेला दिले होते या पार्कसाठी महेश खरे यांनी वारंवार पाठपुरावा केला पण यात श्रेय वादाची लढाई असल्यामुळे याचे श्रेय (आरपीआय) ला मिळूच नये व यांचा समाज सारखा सारखा आमच्या मागे पुढे फिरावा, व वर्तमान काळात रिपब्लिकन पक्षाचा नेताच तयार होऊ नये म्हणून अशा हमेशा कृरघोड्या केल्या जाते आहे, बौद्ध - आंबेडकर समाज एकत्र राहूच नये ही यांची धारणा आहे हे आता समाजाने ओळखायला हवे, हे सार सत्य काय आहे ते पण समाजाला कळाले पाहिजे म्हणून ही सारी स्वाभिमानी बा भीमाची लेखणी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गौत्तम बुद्धांच्या कार्यक्रमस्थळी येण्यासाठी वेळच नाही मात्र त्याच दिवशी त्यांना नवी मुंबई विमानतळाची पहाणी करण्यासाठी वेळच वेळ आहे अशी चर्चा सर्व जनता करत आहे उपमुख्यमंत्री डायरेक्ट साताऱ्यावरून नवी मुंबई विमानतळावर दाखल झाले आणि विमानतळाची पाहणी केली परंतु नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नियोजित कार्यक्रम नेरूळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई पार्क या भव्यदिव्य उद्यानात विश्वाला शांतीचा संदेश देणारे शांतिदूत तथागत भगवान गौत्तम बुद्ध यांच्या भव्यदिव्य मूर्ती अनावरण स्थळी भेट देऊ शकले नाहीत त्यांना वेळच मिळाला नाही वाहरे...वा अजब गजब की सरकार...



## बोधी पार्क

नवी मुंबईच्या भूमीवरी,
'ज्वेल ऑफ नवी मुंबई' नाव,
उद्यानाचे सौंदर्य असे,
जणू स्वर्गाचे गाव.
हिरवीगार वनराई,
फुलांचा बहर छान,
तिथेच दिसे आता,
बुद्धांची मूर्ती महान.
तथागत गौतम बुद्ध,
शांतीचे प्रतीक सोज्वळ,
मूर्ती त्यांच्या दर्शनाने,
मन होई निर्मळ.
शांतता आणि प्रेम,
शिकवण त्यांची खास,
उद्यानी येता वाटे,
नवा चैतन्याचा भास.
मंद वारा वाहे,
पक्ष्यांचे मंजुळ गीत,
बुद्धांच्या अस्तित्वाने,
वाटे सर्वत्रच प्रीत.
प्रेरणा देई ही मूर्ती,
जीवनाला नवा अर्थ,
दुःख, क्लेश विसरून,
होई मन कृतार्थ.
या पवित्र स्थळी,
घेऊया थोडा विसावा,
शांतीचा संदेश,
हृदयात खोल रुजावा.
'ज्वेल ऑफ नवी मुंबई' हे,
आता अधिकच शोभले,
बुद्धांच्या कृपेने,
राजानंद शांत झाले.

# एसबीआय लातूरच्या वतीने गरीब, होतकरू विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप







लातूर (प्रतिनिधी) :- एसबीआय बँक सामाजिक बांधीलकी जपण्यासाठी अनेक उपक्रम राबवते. जसे शैक्षणिक, आरोग्य, शेतकरी व महिला बचतगटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे आणि वृक्षारोपण यासारखे उपक्रम राबवते. या अनुषंगाने सोमवारी,दि. १४ जुलै २०२५ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया लातूर शाखेच्या वतीने गरजू व होतकरू विद्यार्थिनींना सायकलीचे मोफत वाटप करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास अनिरुद्धकुमार चौधरी जनरल मॅनेजर महाराष्ट्र विभाग तसेच नागेश्वर राव डेप्युटी जनरल मॅनेजर नांदेड विभाग, लातूर एसबीआयचे अमरसिंग सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सदरील कार्यक्रमास कै. जनार्धनराव राजेमाने प्रायमरी सेकंडरी हायर सेकंडरी आश्रम शाळा जानवळ ता. चाकूर तसेच सिद्धेश्वर सेकंडरी आणि हायर सेकंडरी स्कूल झरी बुद्रुक, ता. चाकुर येथील विद्यार्थ्यांनीना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी नागेश्वर राव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, बचत ही जीवनाचा अविभाज्य घटक असून आजची बचत उद्याचे भविष्य ठरवत असते याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले तसेच शिक्षणाबाबत महत्त्व पटवून देताना ते म्हणाले की, जिवनात खुप शिका आणि मोठ्या पदावर पोहोचून आपले जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करा, विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी एक गोष्ट लक्षात ठेवणे महत्त्वाचे असल्याचे सांगून करिअर घडवल्यानंतरच लग्नाचा विचार करावा ज्यामुळे समजत तुमचा सन्मान वाढेल असे मौलिक विचार त्यांनी विद्यार्थिनींन समोर मांडले. एसबीआय बँक सायकल वाटपाव्यतिरिक्त सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण तसेच 'स्वच्छ भारत' सारख्या मोहिमेत सक्रियपणे सहभागी होत असते असे जनरल मॅनेजर अमरसिंग यांनी सांगितले. या अनुशंगाने आज बँकेच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी सायकल वाटपाच्या एसबीआयच्या या सामाजिक उपक्रमाचे शाळेचे संचालक निलेश राजेमाने आणि प्रा. मारुती बुद्रुक पाटील सिद्धेश्वर विद्यालय झरी यांनी आभार मानले. या कार्यक्रमास एसबीआय झरी शाखाप्रमुख अभय हळीकर तसेच लातूर चंद्र नगर शाखेचे रॉबिन बेक यांनी हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले. सदरील कार्यक्रमास मुख्य प्रबंधक ब्रिजेश श्रीवास्तव, मॅनेजर मेंटेनन्स यशवंत निनावे, मुख्य प्रबंधक सचिन देशाळे, फिल्ड ऑफिसर शुभम कासले, अनुराग शेंडे व शुभम दीक्षित आदींसह बँकेचा कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## रात्री अकरानंतर विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई सुरू. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या सूचनेवरून पोलीस रस्त्यावर.



लातूर :- रात्री अकरानंतर विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई सुरू. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या सूचनेवरून पोलीस रस्त्यावर. याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील महत्त्वाच्याव इतर संवेदनशील भागात आत्ता विशेष गस्त मोहीम हाती घेण्यात आली आहे. रात्री अकरानंतर विनाकारण फिरत असलेले टोळके, टवाळकी करत फिरणारे तरुण, दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्यांना पोलीस ठाण्यात नेऊन कारवाई करण्यात येत आहे.

पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी पदभार घेताच लातूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच गुन्हेगारी संदर्भात विविध उपायोजना राबवीत आहेत. त्या अनुषंगाने दिनांक १३ जुलै रोजी रात्री पोलीस अधीक्षक अमोल तांबे ,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे सूचना व मार्गदर्शनात रात्री अकरानंतर विनाकारण रस्त्यावर रेंगाळणाऱ्या टवाळखोरावर कार्यवाही करण्यात आली आहे. त्यांना सूचना घेऊन रस्त्यावरून हाकलून देण्यात आले आहे. यामध्ये शहरातील सर्व पोलीस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी अंमलदार यांचेमार्फत ही संयुक्त मोहीम यापुढे राबविण्यात येणार आहे.

रात्री विनाकारण फिरणाऱ्यांवर पोलिसांचे लक्ष असून,दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांची तपासणी करण्यात येत आहे. या शिवाय चारचाकी वाहनांत रात्री बेकायेदशीर वाहतूक होते का? याचाही तपास सुरू करण्यात येत आहे.

शहरात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी शांतता असावी विनाकारण फिरणाऱ्यावर नियंत्रण ठेवता यावे. गुन्हेगारांची धरपकड करून वेळीच गुन्ह्यांना पायबंध घालने, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई व्हावी, या उद्देशाने ही कारवाई सुरू करण्यात आली रात्री अकरा नंतर रस्त्यावर रेंगळणाऱ्यांची कसून तपासणी करण्यात येणार असून ट्रिपल सीट फिरणाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील कागदपत्रांची तपासणी होत आहे.

लातूर पोलिसाकडून सर्व आस्थापनाधारकांना आवाहन करण्यात येत की, गैरसोय टाळण्यासाठी आपण निर्धारित वेळेतच आस्थापना चालू व बंद करावे.विनाकारण रात्री उशिरापर्यंत आस्थापना चालू ठेवू नये.पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

## तिर्रट जुगार खेळणाऱ्या ३७ जणांवर गुन्हा दाखल. ०३ पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाची कारवाई

लातूर :- तिर्रट जुगार खेळणाऱ्या ३७ जणांवर गुन्हा दाखल. ५,१९,५००/- रूपयांचा मुद्देमाल जप्त. ०३ पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाची कारवाई

याबाबत याबाबत थोडक्यात माहिती अशी की, लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात वेळोवेळी मोहीम राबवून अवैध धंदे करणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे देवणी चे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, पोलीस ठाणे उदगीर शहरचे पोनि गाडे, उदगीर ग्रामीणचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गायकवाड, पोउपनि कदम यांच्या नेतृत्वातील संयुक्त पथकाने उदगीर तालुक्यातील देवणी पोलीस ठाणे हद्दीतील मोघा शिवारातील एका बंद जागेवर छापा मारून तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना ३७ जणांना ताब्यात घेतले आहे.

यामध्ये ५,१९,५००/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. देवणी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील उदगीर- बिदर रोडवरील मोघा येथे १३/०७/२०२५ रोजी २२.४० वाजण्याच्या सुमारास छापा टाकण्यात आला. यादरम्यान ३७ आरोपी तिर्रट नावाचा जुगार रुपये लावून खेळत व खेळवीत असताना सापडल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आले आहे. यामध्ये रोख रक्कम २,४५,०००/- रु तसेच मोबाईल किंमत- २,७४,५००/- रुपये असे किंमत अंदाजे- ५,१९,५००/- रू चा मुद्देमाल जप्त केला आहे.

यामध्ये आरोपी १) संजीवकुमारा माधवराव बिरादार वय-४५ वर्षे रा. भालकी ता. भालकी जि. बिदर २) श्रीकांत मनोहर खासेमपुरे वय-३२ वर्षे रा.बिदर ता.जि.बिदर ३) पांडुरंग भिमराव धायगुडे, वय-४१ वर्षे रा. कासारशिर्सी ता.निलंगा ४) नंदकुमार चंद्रकांत बेल्लाळे, वय-३७ वर्षे रा. सुलतानबागवाडी ता. हुमनाबाद जि.बिदर ५) महादेव बाबुराव मसकल्ले, वय-२६ वर्षे रा.बिदर ता. जि.बिदर ६) रामेश्वर राजकुमार शेटकार ,वय २९ वर्षे रा. भालको ता. भालकी जि. बिदर ७) मेघराज आशोक पाटील वय-३५ वर्षे रा.बेरीबी ता. भालकी जि. बिदर ८) कैलाश रमेश पाटील वय-३५ वर्षे रा.भालकी जि. बिदर ९) राजकुमार रामचंद गौड वय-३४ वर्षे रा.हल्लाळी ता. भालकी १०) चंद्रकांत जगन्नाथ तळघाटे वय-४२ वर्षे रा.संतपुर ता. औराद ११) सल्लाऊदीन अहमदपाशा शेख वय-३२ वर्षे रा.संतपुर ता. औराद १२) चंद्रकांत गणपती पाटील वय-३२ वर्षे रा.संतपुर ता. औराद जि. बिदर १३) कल्लपा धनराज तळघाटे वय-३५ वर्षे रा.संतपुर ता. औराद १४) बंडेप्पा घाळेप्पा कन्नाळे वय-५० वर्षे रा.संतपुर ता.औराद १५) शरणु शिवराज राजापुरे वय-४२ वर्ष रा.भालकी ता. भालकी १६) मारोती संगप्पा मळे वय-३८ वर्षे रा. वल्लेपुर ता. औराद जि.बिदर १७) अनिल कल्लप्पा दापके वय-४५ रा. जुन्नेखेरी ता. औराद जि.बिदर १८) महेश सिद्राम बिरादार वय-३२ वर्षे रा. नागराळ ता. भालकी जि.बिदर १९) रविंद्र कल्लप्पा जिर्गे वय-३५ वर्षे रा.ऐकलर ता. औराद २०) गणेश मलिकार्जुन अंदुरे वय-३४ वर्ष रा.पाटोदा बु. ता.जळकोट २१) शरणप्पा बसप्पा रंजिरे वय-५१ वर्ष रा. सुलतानपुर ता. हुमनाबाद जि. बिदर २२) हानमंत विरशेटीअप्पा जानते वय-३८ वर्षे रा. सुलतानपुर ता. हुमनाबाद जि.बिदर २३) नरसिम्हा व्यंकया गट्टे वय-६७ वर्ष रा. काजीपल्ली विलेज शासकीय शाळेच्या जवळ हैद्राबाद २४) जयपाल व्यंकटराम रेडी वय-४२ वर्ष रा. जिलेलगुडा हैद्राबाद, २५) भिम व्यंकटराव बुक्केवाड वय-३६ वर्ष रा.सावरगाव ता. देवणी २६) अर्जुन सुभाष बिरादार वय-३५ वर्ष रा.सावरगाव ता. देवणी २७) सहदेव श्रीधर बिरादार वय-२७ वर्षे रा. सावरगाव ता. देवणी २८) खालेद गफारसाब कुरेशी वय-४० वर्ष रा. उदगीर ता.उदगीर २९) राहुल आशोक कदम वय-३५ वर्ष रा. नालंदा नगर उदगीर ३०) सत्यनारायण रमेश व्ही. वय ७० वर्ष रा.गटकेसर ता. गटकेसर जि. रंगारेडी, ३१) हानमंत अशोक वारे वय ४५वर्षे रा मुखेड जि नांदेड, ३२) किरण कुमार वय ४० वर्षे रा कत्तापेठ ता जि हैद्रबाद, ३३) नयुम मेहबुबसाब शेख, वय ३५ वर्षे, रा. बनशेळकीरोड उदगीर, ३४) सुरेश चंद्रया एन. वय ४८ रा. हैद्राबाद, ३५) प्रमोद विदयसागर धुमाळे यांचा समावेश असुन ते या ठिकाणी हजर होते तसेच ३६) वजीर महेबुबसाब बंगाली रा. उदगीर हा सदर जुगार क्लब चालवतात. सदर क्लबचे जागेचे मालक ३७) शिवाजी अण्णाराव नेमताबादे (पाटील) यांच्याविरुद्ध देवणी पोलीस स्टेशन मध्ये गुरनं २३४/२०२५ कलम २२३ व ११२ इछ्ड सह कलम १२ (अ) ४, ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम नुसार गुन्हा नोंद झाला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पोउपनि व-हाडे करीत आहेत. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे देवणी, उदगीर शहर व उदगीर ग्रामीणच्या पोलिस अधिकारी अमलदारांच्या संयुक्त पथकाने केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE